## - **व्यवस्थापन परिषद सभेचा कार्यवृत्तांत** -

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा शुक्रवार दि.२८/०३/०८ रोजी सकाळी ११-०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे | सदस्या |
| ३) | ॲड. रामदास पी. सब्बन | सदस्य |
| ४) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ५) | प्रा. डॉ. पी. बी. जोशी, प्रभारी संचालक, म. व वि.वि.मं. - पदसिध्द | सदस्य |
| ६) | प्राचार्य जे. के. बिले | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ८) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| ९) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| १०) | श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्या |
| ११) | प्रा. बी. पी. रोंगे | सदस्य |
| १२) | डॉ. डी. डी. रणनवरे | सदस्य |
| १३) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम | सदस्या |
| १४) | प्रा. डॉ. पी. बी. जोशी - प्रभारी वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १५) | डॉ. एम. एस. शेजूळ - परीक्षा नियंत्रक तथा प्र.कुलसचिव | स्थायी निमंत्रित तथा सचिव |

सभेच्या सुरुवातीला प्र.कुलसचिव यांनी मा.कुलगुरु आणि सर्व सन्माननीय व्यवस्थापन परिषद सदस्यांचे स्वागत केले. श्री. पी. एम. हिरेमठ व डॉ. बी. बी. कदम यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सभेस अनुपस्थित राहणार असल्याचे पत्राद्वारे कळविले याची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.

सोलापूर विद्यापीठाच्या संकुल प्रणालीच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिल्याची माहिती मा.कुलगुरु यांनी सभागृहास दिल्यानंतर मा.कुलगुरु आणि सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे अभिनंदन करण्यात आले हा अभिनंदन प्रस्ताव डॉ. एल. पी. देशमुख यांनी मांडला आणि त्यास डॉ. श्रीमती व्ही. जे. नाईकनवरे यांनी अनुमोदन दिले.

**विषय क्र. १ दि.२७ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र.१ दि. २७ डिसेंबर २००७ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.**

**विषय क्र. २ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा. कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**( सोबत अहवाल जोडला आहे.)**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव क्र. २ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा. कुलगुरु यांनी सादर केलेला अहवाल खालील दुरुस्त्यांसह मान्य करावा असे ठरले.**

**१) पान क्र. ३ वर, वित्त व लेखा विभागाच्या माहितीमधील, ओळ क्र. ४ मध्ये, "आज अखेर" या शब्दाऐवजी "दिनांक" घालावा.**

**विषय क्र. ३** **सोलापूर विद्यापीठाकडील बहि:स्थ विद्यार्थ्यांना नोंदणीपासून ते परीक्षा निकालापर्यंतची संपूर्ण सेवा संगणकाद्वारे देण्याबाबतचा महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) यांचा प्रस्ताव व यासंदर्भात सोलापूर विद्यापीठ व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) यांच्यामध्ये करावयाच्या सामंजस्य कराराचा मसूदा (Draft of MoU) व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी : सोलापूर विद्यापीठाकडील संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना रु.५०/- इतकी फी आकारुन ई-सुविधा सेवा महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) यांच्याकडून देण्यात येत आहे. बहि:स्थ विद्यार्थ्यांना प्रवेश घेतल्यानंतर त्यांच्या निकाल प्राप्तीपर्यंत संपूर्ण सेवा संगणकाद्वारे देण्याबाबत महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) यांनी तयारी दर्शविलेली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) आणि सोलापूर विद्यापीठ यांच्यामध्ये करावयाच्या सामंजस्य कराराचा मसूदा (Draft of MoU) सोबत जोडला असून तो व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ३** **सोलापूर विद्यापीठाकडील बहि:स्थ/डिस्टन्स एज्युकेशन या विद्यार्थ्यांना नोंदणीपासून ते परीक्षा निकालापर्यंतच्या संपूर्ण सेवा संगणकाद्वारे देण्याबाबतच्या महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) व सोलापूर विद्यापीठ यांच्यामध्ये करावयाच्या सामंजस्य कराराच्या मसूद्यास दुरुस्त्यांसह एकूण रु.७५/- प्रतिवर्षी प्रतिविद्यार्थी महाराष्ट्र ज्ञान महामंडळास देण्याच्या अटीवर मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र. ४** **चेंजिस इन स्टाफच्या समितीने तसेच व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेल्या श्रीमती निरंतर एस. आर. यांच्या चेंजिस इन स्टाफ मधील मान्यतेबाबत.**

चेंजिस इन स्टाफ समितीच्या बैठक दि.२०/१२/२००७ रोजी झाली. सदरच्या बैठकीमध्ये श्रीमती निरंतर एस. आर. यांना मान्यता दिलेली आहे. दि.२७/१२/२००७ रोजी व्यवस्थापन परिषदेने श्रीमती निरंतर एस. आर. यांना मान्यता दिलेली आहे सदर महाविद्यालयाच्या प्राचार्याच्या पत्रान्व्ये व निवड समितीच्या अहवालावरुन असे दिसते की, श्रीमती निरंतर एस. आर. यांना परिविक्षाधीन कालीन मान्यता दिली होती त्यांची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. तसेच चेंजिस इन स्टाफचा समितीचा अहवालही सोबत जोडला आहे. त्यात श्रीमती निरंतर एस. आर. यांना परिविक्षाधीन कालीन मान्यतेसाठी सदर विषय व्यवस्थापन परिषदेसाठी विचारार्थ व मान्यतेसाठी.

**ठराव क्र. ४** **अ) श्रीमती निरंतर एस. आर. यांच्या चेंजिस इन स्टाफला दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**
**ब) भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव, सोलापूर यांचे पत्र जा.क्र. BIGCE/EST/०७-०८/१०९८ दि.१६/२/२००८ च्या पत्रातील प्राचार्य म्हणून सही आहे त्यांना प्राचार्य म्हणून विद्यापीठाची मान्यता आहे काय याबद्दल महाविद्यालयास खुलासा विचारावा असे ठरले.**

**विषय क्र. ५ विद्यापीठाशी संलग्नित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना "Core B.Ed Teacher Training Curriculum" सुरु करण्याबाबत Intel Technology India Pvt. Ltd., यांच्याबरोबर करावयाच्या सामजंस्य करार (MoU) करण्याबाबत मसूदा (Draft of MoU) व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ.**

टिपणी : विद्यार्थी आणि शिक्षक यांना कौशल्ये जसे की, तंत्रज्ञान साक्षरता, टीकात्मक परीक्षण, समस्या सोडवणूक आणि समन्वय इ. मुळे रोजगार, कामाची उत्पादकता वाढविणे, आणि उच्च स्पर्धात्मक कामाच्या ठिकाणी गुणवत्ता व कार्यकुशलता वाढविणे इ. बाबत सोलापूर विद्यापीठ आणि इंटेल टेक्नॉलॉजी इंडिया प्रा. लि. यांच्यामध्ये सामजंस्य करार करण्याचा विषय आणि याबाबतचा सोलापूर विद्यापीठ व इंटेल टेक्नॉलॉजी इंडिया प्रा. लि. यांच्यामध्ये करावयाचा सामजंस्य करार (MoU) चा मसूदा (Draft of MoU) व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ५ विद्यापीठाशी संलग्नित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना "Core B.Ed Teacher Training Curriculum" चे प्रशिक्षण देण्याबाबतचा Intel Technology India Pvt. Ltd. आणि सोलापूर विद्यापीठ यांच्यामध्ये करावयाच्या सामजंस्य करारास (MoU) दुरुस्त्यांसह व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ६ श्री. एम. आर. कोरवी, लेखापाल यांच्या विभागीय परीक्षेबाबत.**

टिपणी : शिवाजी विद्यापीठाने कार्यालयीन आदेश क्र.SU/EST/3030 dt.5th July 1999 नुसार श्री. एम. आर. कोरवी यांची लेखापाल (वर्ग -२ ) या पदी नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. एम. आर. कोरवी हे लेखापाल या पदी दि. ३०/०७/१९९९ रोजी कामावर हजर रुजू झाले आहेत. सदर नियुक्ती आदेशात त्यांना विभागीय परीक्षा दोन वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक असल्याची अट घालण्यात आली होती. शिवाजी विद्यापीठाने त्यांची परीक्षा दोन वर्षात न घेता दोन वर्षानंतर दि. १९/१२/२००३ रोजी घेतली होती, सदर विभागीय परीक्षेत श्री. एम. आर. कोरवी हे अनुत्तीर्ण झालेत.

शिवाजी विद्यापीठाचे परिपत्रक क्र.आस्थापना/३४९१ दि.२४/१०/२००२ अन्वये "वर्ग - २ मधील जे विद्यापीठ कर्मचारी ज्या दिनांकाला ते अन्यथा पदोन्नती मिळण्यास पात्र ठरले असते. त्या दिनांकाला त्यांच्या वयाला पंचेचाळीस वर्षे पूर्ण झाली असल्यास त्यांनी विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही" असे नमूद केले आहे. तथापि परिपत्रकामध्ये ज्या ज्या वेळी शिक्षकेतर सेवकांच्या नियुक्ती व पदोन्नतीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट अंतर्भूत केली असेल त्या नियमावलीनुसार विभागीय परीक्षा द्यावयाची आहे असे नमूद केले आहे.

शासन निर्णयानुसार वयाची पंचेचाळीस वर्षे पूर्ण झाल्यानंतर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सुट देण्यात येते. श्री. कोरवी यांना वयाची ४५ वर्षे दि.१२ जुलै,२००५ रोजी पूर्ण झालेली आहेत.

श्री. एम. आर. कोरवी यांची लेखापाल या पदी एकूण ९ वर्षे सेवा झालेली आहे. विद्यापीठाने ही त्यांची विभागीय परीक्षा दोन वर्षात घेतलेली नाही तसेच ऑगस्ट, २००४ पासून आजतागायत या विद्यापीठाने ही त्यांची विभागीय परीक्षा घेतलेली नाही. श्री. एम. आर. कोरवी यांनी वयाची ४५ वर्षे पुर्ण केल्याच्या दिनांकापासून परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्याबाबत विभागीय परीक्षा घ्यावयाची किंवा त्यांना नियुक्तीच्या वेळी घालण्यात आलेली विभागीय परीक्षेची अट शिथिल करावयाची याबाबत धोरणात्मक निर्णय होणेकरिता सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. ६** **उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग मुंबई यांची अधिसूचना क्र. एससीआर-१८९५/(१९७/९५)/विशि-३ महाराष्ट्र दि.१९ मार्च १९९६ नुसार तसेच शिवाजी विद्यापीठाचे परिपत्रक क्र.आस्थापना/३४९१ दि.२४/१०/२००२ नुसार श्री. एम. आर. कोरवी लेखापाल यांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केलेली असल्यामुळे त्यांना विभागीय परीक्षेची अट शिथिल करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ७** **दि. १ ऑगस्ट, २००४ पासून मान्य असलेले अधिक्षक हे पद २८/६/२००७ ऐवजी २८/७/२००६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नतीस व मान्यता देणेबाबतची बाब विचारार्थ.**

टिपणी : व्यवस्थापन परिषदेच्या दि.२७/१२/२००७ च्या बैठकीत ठराव क्र. १४ नुसार सदरचे पद हे दि.२८/६/२००७ पासून पदोन्नतीने भरले आहे. त्याची व्यवस्थापन परिषदेमध्ये नोंद घेतलेली आहे.

शासन निर्णय क्रमांकः एसयुएस - २००५/(१२३/०५)/विशि-५, दिनांक ११ मे, २००७ नुसार जी ४१ शिक्षकेतर पदे विद्यापीठाच्या आस्थापनेवर दिनांक १ ऑगस्ट, २००४ पासून मंजूर आहेत, त्या मंजूर पदामध्ये अधिक्षक या पदाचा समावेश आहे. असे असतानाही हे पद २८/६/२००७ पासून पदोन्नतीने भरले गेलेले आहे.

सदर पद हे पदोन्नतीने भरण्यासाठी विद्यापीठाकडे १ ऑगस्ट, २००४ रोजी पदोन्नतीसाठी पात्र उमेदवार नसल्याने त्या दिनांकापासून पदोन्नती देता आलेली नाही. या पदासाठी सेवाजेष्ठ कर्मचारी हे २८/७/२००६ रोजी पदोन्नतीसाठी पात्र आहेत.

त्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या दि.२७/१२/२००७ च्या बैठकीतील ठराव क्र. १४ मध्ये दुरुस्ती करुन अधिक्षक हे पद सेवाजेष्ठ कर्मचारी यांचेमधून २८/७/२००६ पासून पदोन्नतीने साखळी पध्दतीने मान्यता असावी.

वरील सारांशाचा विचार करता या संबंधित कर्मचाऱ्यांना दिलेल्या पदोन्नतीच्या आदेशामध्ये सुधारणा करुन सुधारीत कार्यालयीन आदेश व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर निर्गमित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ७** **मा. शिक्षण सहसंचालक कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांच्या मान्यतेच्या अधीन राहून दि. १ ऑगस्ट, २००४ पासून मान्य असलेले अधिक्षक हे पद २८/६/२००७ ऐवजी २८/७/२००६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने साखळी पध्दतीने पदोन्नतीस व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ८** **मुलींच्या वसतिगृहाच्या सुधारित अंदाजपत्रकाच्या मंजूरीबाबत.**

दि.२२/१/२००८ रोजी बांधकाम समितीच्या झालेल्या सभेतील विषय क्र. २ वरील ठरावानुसार, निविदेतील दराप्रमाणे जास्त झालेल्या परिमाणाचे सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे कामाच्या वावास बांधकाम समिती व्यवस्थापन परिषदेस शिफारस करत आहे. त्यामुळे सदरहू बांधकामाचे खर्चाची रक्कम रु.५८,३८,०८४/- इतक्या रकमेऐवजी रु.७५,००,९३०/- इतकी होत आहे व त्या वाढीव रकमेच्या मंजूरीसाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करीत आहे.

व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ८ मुलींच्या वसतिगृहाच्या सुधारित अंदाजपत्रकाच्या मंजूरीबाबत -**

**१) मंजूर निविदेपेक्षा जादाच्या बांधकामास मान्यता देण्यात आली.**

**२) दि.२६/३/२००८ पूर्वी झालेल्या बांधकामाची देयके मंजूर निविदेवरील दराप्रमाणे देण्यास मान्यता देण्यात आली.**

**३) दि.२६/३/२००८ नंतर उर्वरित अपूर्ण असलेले बांधकाम पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून Price Excalation च्या clause प्रमाणे देयके देण्यास मान्यता देण्यात आली.**

**४) वास्तुविशारद श्री. यादगिरी कोंडा यांची फी सर्व बांधकामासाठी प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या (विद्युतीकरण, आकस्मिक खर्च, मूल्यवर्धित कर इ. वगळून) २% प्रमाणे द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. ९ मल्टीक्लासरुम कॉम्प्लेक्स इमारतीच्या बांधकामाबाबत.**

दि.२२/१/२००८ रोजी बांधकाम समितीच्या झालेल्या सभेतील विषय क्र. ५ वरील ठरावानुसार, निविदेतील दराप्रमाणे जास्त झालेल्या परिमाणाचे सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे कामाच्या वावास बांधकाम समिती व्यवस्थापन परिषदेस शिफारस करत आहे. त्यामुळे सदरहू बांधकामाचे खर्चाची रक्कम रु.१,०५,२२,७६०/- इतक्या रकमेऐवजी रु.१,४५,०१,०३८/- इतकी होत आहे व त्या वाढीव रकमेच्या मंजूरीसाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करीत आहे.

व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ९ मल्टीक्लासरुम कॉम्प्लेक्स इमारतीच्या बांधकामाबाबत -**

**१) मंजूर निविदेपेक्षा जादाच्या बांधकामास मान्यता देण्यात आली.**

**२) दि.२६/३/२००८ पूर्वी झालेल्या बांधकामाची देयके मंजूर निविदेवरील दराप्रमाणे देण्यास मान्यता देण्यात आली.**

**३) दि.२६/३/२००८ नंतर उर्वरित अपूर्ण असलेले बांधकाम पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून Price Excalation च्या clause प्रमाणे देयके देण्यास मान्यता देण्यात आली.**

**४) वास्तुविशारद श्री. यादगिरी कोंडा यांची फी सर्व बांधकामासाठी प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या (विद्युतीकरण, आकस्मिक खर्च, मूल्यवर्धित कर इ. वगळून) २% प्रमाणे द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. १० मा.कुलगुरु यांच्या विस्तारीत कार्यालयासाठी फर्निचर (अंतर्गत सजावटीचे) काम करुन घेण्यासाठी जादा झालेल्या खर्चाचे देयक रक्कम रु.२,२४,५८९/- श्री. राहूल दबडे अँड असोसिएट यांना अदा करण्याबाबत..**

कुलगुरु यांच्या विस्तारीत कार्यालयासाठी फर्निचर (अंतर्गत सजावट) तयार करुन घेण्यासाठी रु.९,३५,०००/- इतक्या रकमेची टेंडर नोटीस देण्यात आलेली होती. सदर कामासाठी श्री. राहूल दबडे अँड असोसिएटस, सोलापूर यांचे कमी दर असलेले टेंडर रक्कम रु.९,०२,५७२/- मंजूर करण्यात आलेले होते. सदर काम करताना रु.२,२४,५८९/- इतक्या रुपयांचे जादा काम झालेले आहे. जादाचे काम व मोजमाप तपासण्यासाठी मा.कुलगुरु यांनी त्रिसदस्यीय समितीची नियुक्ती केली. सदर समितीच्या बैठकीचा अहवाल प्राप्त होताच व्यवस्थापन परिषदेस सादर करण्यात येईल. त्याबाबत सविस्तर मोजमाप घेऊन तांत्रिक समितीने बांधकाम समितीस रु.२,२४,५८९/- राहूल दबडे अँड असोसिएट, सोलापूर यांना अदा करण्याबाबत शिफारस केलेली आहे.

सबब, व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १०** **१) मा.कुलगुरु कार्यालयाच्या अंतर्गत सजावटीसंदर्भात मा.कुलगुरुमहोदय यंनी नियुक्त केलेल्या उपसमितीचा अहवाल मान्य करण्यात आला.**
**२) सदर प्रकरणी मा. माजी कुलगुरु डॉ. इरेश स्वामी व निलंबित कुलसचिव डॉ. पी. बी. कुंभार आणि वास्तुविशारद श्री. यादगिरी कोंडा यांच्या तोंडी आदेशावरुन मे. राहूल दबडे अँड असोसिएट यांच्याकडून काम करुन घेतले याबाबत त्यांचे म्हणणे मागवून घेऊन ते व्यवस्थापन परिषदेच्या पुढील सभेसमोर ठेवण्यात यावे.**
**३) मे. राहूल दबडे अँड असोसिएट यांनी केलेल्या जादा कामाच्या परिमाणास (Quantity) मान्यता देण्यात आली.**
**४) सदर मे. राहूल दबडे अँड असोसिएट यांचे जादा कामापोटीचे पहिले व शेवटचे देयक म्हणून रु.२,२४,५८९/- (रुपये दोन लाख चोवीस हजार पाचशे एकोणनव्वद फक्त) अदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र. ११** **ॲड. अशोक ठोकडे यांना कायदा सल्ल्याबाबतचे मानधनाबाबत.**

टिपणी:- सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेनंतर विद्यापीठाच्या जिल्हा व सत्र न्यायालय सोलापूर आणि उच्च न्यायालय, मुंबई येथील कोर्ट केसेससंबंधी सल्लामसलतींचे काम ॲड. अशोक ठोकडे हे आजपावेतो पहात आहेत. वकीलाचे मानधन अदा करण्याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि. १४ जून २००७ रोजीच्या सभेत विषय क्र. ४ अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवण्यात आलेला होता. यावर वकीलाचे मानधन शिवाजी विद्यापीठाच्या परिपत्रक जा. क्र. आस्थापना/३५८१ दि.१०/१०/२००२ (सोबत प्रत) अन्वये मानधन अदा करावेत असा ठराव झालेला होता. परंतु, दि.१४ जून, २००७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करत असताना या ठरावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे.
**"वकीलाचे मानधन, कायदेशीर बाबी व अनुषंगिक बाबी, वकीलाचे पॅनेल ठरविणे याकरिता द्विसदस्यीय समिती (ॲड. रामदास सब्बन आणि प्राचार्य जे.के. बिले) अहवाल सादर करेल अशी दुरुस्ती केली".**
जोपर्यंत वकीलाच्या मानधनाबाबत निर्णय होत नाही तोपर्यंत शिवाजी विद्यापीठाच्या दि.१०/१०/२००२ च्या परिपत्रकाप्रमाणे मानधनाची कार्यवाही करण्याचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ११** **शिवाजी विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र. आस्थापना/३५८१ दि.१०/१०/२००२ मधील तक्त्याप्रमाणे ॲड. अशोक ठोकडे यांचे कायदेशीर सल्ल्याबाबतचे बिल अदा करावे असे ठरले. तसेच वकीलांचे पॅनेल तयार करण्यासाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन तुलानात्मक तक्ता तयार करुन आगामी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवावा असे ठरले.**

**विषय क्र. १२** **सोलापूर विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमाच्या सुधारित शुल्काचा Ordinance व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

(सोबत सदरचा नियोजित Ordinance जोडला आहे.)

(टिपणी : जून २००६ पासून सोलापूर विद्यापीठ व महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमाचे शुल्क ठरवण्यासाठी विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषद यांची प्राचार्य जे. के. बिले यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. पी. जी. मोरे, डॉ. डी. डी. रणनवरे, प्राचार्य के. एम. जमादार व श्री. एस. के. मठपती यांची संयुक्त समिती विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेने गठीत केलेली होती. सदरच्या समितीने विविध प्रकारच्या शुल्क निश्चितीची बैठक दि. २०/०२/२००८ झालेले आहे. सदरचा अहवाल सोबत जोडला आहे. सदरचे शुल्क व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५३ व ५४ अन्वये सदरच्या शुल्काचा Ordinance तयार करुन त्यास मा. कुलपती तथा राज्यपाल यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

सदरचा Ordinance तयार करणेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

ठराव क्र. १२ १) पान क्र. ६६ वर, अपेंडीक्स क्र. १ बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स (बी.सी.एस.) मधील फी स्ट्रक्चर मध्ये लायब्ररी फी रु.५०/- ऐवजी रू.१००/-, जिमखाना फी रु.८०/- ऐवजी रु.१२०/-, लॅबोरेटरी फी रु.२५०/- ऐवजी रु.१०००/-, नियतकालिक फी रु.१०/- ऐवजी रु.५०/- अशी वाढ करावी. आणि पेपर चार्जेस रु.५/- वगळून इंटरनेट फी रु.१००/- करावी तसेच सी.डी.एफ. (कॉलेज डेव्हलपमेंट फंड) म्हणून रु.५०/- चा समावेश करावा.

२) पान क्र. ६६ वर, अपेंडीक्स क्र. २ मास्टर ऑफ एज्युकेशन (एम.एड.) मधील फी रु.३०,०००/- शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांनी मान्य केल्याप्रमाणे स्वीकारण्याचे ठरले.

विषय क्र. १३ व्यवस्थापन परिषद दिनांक २७/१२/२००७ मधील ठराव क्र.१६ अनुसार डॉ. सुभाष कदम यांच्या चौकशी समितीच्या संदर्भात त्यांना मागणी केलेली सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांना पुरविण्यात आलेल्या आहेत. सदर विषयाच्या अनुशंगाने त्यांना दिनांक ०७/०३/२००८ रोजी व्यवस्थापन परिषदेसमोर आपले म्हणणे मांडण्यास हजर राहण्यास कळविलेले आहे. तरी डॉ. सुभाष कदम यांचे म्हणणे नैसर्गिक न्यायानुसार व्यवस्थापन परिषदेसमोर ते मांडतील याबाबत सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव क्र. १३ प्राचार्य डॉ. सुभाष कदम यांनी विद्यापीठास दिलेल्या पत्रावर चर्चा झाल्यानंतर आणि त्यांनी त्यांचे म्हणणे व्यवस्थापन परिषदेसमोर मांडल्यानंतर त्यांच्या मागणीनुसार परत एकदा त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी त्यांना व्यवस्थापन परिषदेच्या पुढील सभेत बोलाविण्याचे ठरले.

विषय क्र. १४ व्यवस्थापन परिषद दिनांक २७/१२/२००७ मधील ठराव क्र. १० च्या निर्णयानुसार डॉ. धिमधिमे व डॉ. नांदगावकर, डॉ. आर. आर. पाटील, डॉ. एस. ए. हलकुडे व श्रीयुत चांदोडे यांना त्यांचे म्हणणे व्यवस्थापन परिषदेने ठरविल्यानुसार नेमलेल्या उपसमितीच्या समोर दिलेले आहे. सदरचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

टिपणी : सदरचे उपसमितीचे बैठक दि. ४/०२/२००८ रोजी मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. त्याचा कार्यवृत्तांत सोबत जोडला आहे. सदर समितीची आणखी एक बैठक प्रस्तावित असून त्यामध्ये डॉ. नांदगावकर व डॉ. हलकुडे हे आपले अधिकचे म्हणणे मांडणार आहेत. त्या बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या वेळी सर्व सदस्यांना देण्यात येईल. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव क्र. १४ नैसर्गिक न्यायतत्वानुसार माजी कुलगुरु मा. डॉ. इरेश स्वामी यांना या अहवालाची प्रत व त्या अनुषंगिक exhibits च्या प्रती देऊन त्याबद्दल त्यांचे म्हणणे घेण्यात यावे व त्यासह विषय पुढील व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात यावा असे ठरले.

**विषय क्र. १५ विद्यापीठाकडील नव्याने भरावयाच्या वर्ग १ व वर्ग २ वरील पदांकरिता निवडसमितीवरील व्यवस्थापन परिषदेमधून करावयाच्या नामनिर्देशनाबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

<u>**टिपणी:-**</u> सोलापूर विद्यापीठास शासन निर्णय क्र.एसयुएस-२००५/(१२३/०५)/ विशि-५, दि.११ मे, २००७ नुसार, एकूण १५० शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध शासनाने मंजूर केला आहे. तसेच पूर्वीच्या ४१ शिक्षकेतर पदांपैकी रिक्त ७ पदे भरण्यासही मान्यता मिळालेली आहे. नव्याने भरावयाच्या वर्ग १ व वर्ग २ या श्रेणीतील शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांच्या निवडीकरीता प्रमाणसंहिता मधील ४ (ii) नुसार खालील निवडसमिती गठीत करणे आवश्यक आहे.

<u>**वर्ग १ करीता निवड समिती :-**</u>

१) कुलगुरु - अध्यक्ष.
२) विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवरील मा.कुलपतींचे प्रतिनिधी - सदस्य.
३) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे किंवा शिक्षण सहसंचालकापेक्षा कमी दर्जा नसलेला शिक्षण संचालकाचा प्रतिनिधी - सदस्य.
४) व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले दोन सदस्य - सदस्य.
५) कुलसचिव - सदस्य सचिव.

<u>**वर्ग २ करीता निवड समिती :-**</u>

१) कुलगुरु - अध्यक्ष.
२) व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेला एक सदस्य - सदस्य.
३) कुलसचिव - सदस्य सचिव.

सबब, वर्ग १ करीता निवड समितीवरील क्र. ४ नुसार व्यवस्थापन परिषदेमधून २ सदस्य आणि वर्ग २ करीता निवड समितीवरील क्र. २ नुसार व्यवस्थापन परिषदेमधून एक सदस्य यांचे नामनिर्देशनाचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १५ अ) विद्यापीठाकडील नव्याने भरावयाच्या वर्ग १ च्या शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांच्या निवडसमितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन केलेले सदस्य खालीलप्रमाणे -**

**i) डॉ. डी. डी. रणनवरे - सदस्य.**
**ii) डॉ. एल. पी. देशमुख - सदस्य.**

**ब) विद्यापीठाकडील नव्याने भरावयाच्या वर्ग २ च्या शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांच्या निवडसमितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन केलेले सदस्य खालीलप्रमाणे -**

**i) प्रा. एन. बी. पवार - सदस्य.**

**विषय क्र. १६ क्रीडा विभागाच्या BOS & PC समितीच्या बैठकीत प्रोरेटा शुल्क वाढविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

टिपणी:- दि. ०७/०७/२००७ रोजी क्रीडा विभागाची Board of Sports & Physical Culture (BOS & PC) बैठक संपन्न झालेल्या ठरावानुसार सन २००८-२००९ पासून प्रोरेटा शुल्क रु.२५/- ऐवजी रु.५०/- असावी असे समितीमध्ये ठराव झालेला आहे.

सबब, फी वाढीचा अधिकार ही महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ २८(फ) अन्वये असल्याने सदर विषय व्यवस्थापन परिषदेसाठी विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १६ क्रीडा विभागाच्या BOS & PC समितीच्या बैठकीतील ठरावानुसार, प्रोरेटा शुल्क रु.२५/- ऐवजी रु.४०/- करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. १७ युवा महोत्सव फी रु.२०/- ने वाढविणेबाबत..**

टिपणी :- विद्यापीठाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने दरवर्षी युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. सदर युवा महोत्सवासाठी महाविद्यालयीन व अधिविभागातील प्रत्येक विद्यार्थ्यांकडून रु.१०/- इतकी फी आकारली जाते. यापैकी विद्यापीठाकडे रु.६/- जमा होतात व महाविद्यालयाकडे रु.४/-असतात.

विद्यार्थी कल्याण विभागातील युवा महोत्सव समितीची बैठक दि.२७/०६/२००७ रोजीच्या बैठकीत विषय क्र.११ नुसार असा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे की, वरील फी रु.१०/- ऐवजी रु.२०/- इतकी असावी व त्यापैकी रु.१२/- हे विद्यापीठाकडे जमा करण्यात यावेत व रु.८/- संबंधित महाविद्यालयाकडे असावेत असा ठराव करण्यात आला आहे. (सदर बैठकीचा कार्यवृत्तांत संलग्न आहे.)

सबब, कोणत्याही प्रकारची फी वाढविणेचा अधिकार हा व्यवस्थापन परिषदेकडे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ / २८ (फ) अन्वये असल्याने सदर फी वाढी बाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेकडे विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १७ युवा महोत्सव फी रु.१०/- ऐवजी रु.२०/- करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. १८ कै. प्राध्यापक अरविंद रायखेलकर व ONGC डेहराडून येथील शास्त्रज्ञ यांची ग्रंथसंपदा विद्यापीठ ग्रंथालयास देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत**

**(सोबत :- ग्रंथालय उपसमितीचा अहवाल सादर.)**

माननीय डॉ. अभय रायखेलकर यांची सोबतच्या पत्रान्वये त्यांच्या वडीलांचा ग्रंथसंग्रह व मा. विभागप्रमूख भूशास्त्र विभाग, सोलापूर विद्यापीठ,सोलापूर मार्फत ONGC डेहराडून येथील शास्त्रज्ञ यांची त्यांचा व्यक्तीगत ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगी म्हणून देण्याची इच्छा असून त्यास मा.कुलगुरु महोदय यांनी सहमती दर्शविली असून त्याबाबत त्यांना पत्र पाठविण्यात आले आहे. सदरचा ग्रंथसंग्रह स्विकारणेबाबत महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा १९९४ नं.२८(h) प्रमाणे स्विकारणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवून मान्यता घेण्याकरिता सविनय सादर.

**ठराव क्र. १८ ग्रंथालय उपसमितीच्या दि.०५/०३/२००८ रोजीच्या अहवालातील शिफारशीस व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. १९ तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

टिपणी :-तक्रार निवारण समितीकडे आलेल्या अर्जाची छाननी करुन सदरचे अर्ज तक्रार निवारण समितीपुढे सुनावणीसाठी ठेवण्यात आलेले होते. सदरच्या अर्जावर निर्णय झालेल्या शिफारशी सोबत जोडलेल्या आहेत.

सदरच्या शिफारशींना Statutes ३३५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता आवश्यक आहे. याकरिता तक्रार निवारण समितीच्या शिफारशी मा.व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. १९ सदरचा विषय फेरसादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. २० सोलापूर विद्यापीठाचा सन २००६-२००७ चा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

सन २००६-२००७ चा वार्षिक अहवाल तयार करण्यात आला असून सदरच्या अहवालास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (क क) नुसार मान्यता घेणे आवश्यक आहे. सदरचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. २० सोलापूर विद्यापीठाच्या सन २००६-२००७ च्या वार्षिक अहवालाबाबत काही सूचना/अभिप्राय असल्यास त्या दि.१५ एप्रिल, २००८ पूर्वी व्यवस्थापन परिषद सदस्यांना कार्यालयाकडे द्याव्यात. दुरुस्त्यांसह सन २००६-२००७ च्या वार्षिक अहवालास व्यवस्थापन परिषदेने मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. २१ बांधकाम समितीच्या दि.०५/११/२००७ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तांतावर मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी.**

टिपणी :- सन २००७-०८ या आर्थिक वर्षात शासनाने बांधकामापोटी सोलापूर विद्यापीठास रु.४.५० कोटी निधी मंजूर केलेला आहे. रु.४.५० कोटी निधीचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आले आहेत. दि.०५/११/२००७ रोजीच्या बांधकाम समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) नुसार मान्यता दिलेली आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र. २१ बांधकाम समितीच्या दि.०५/११/२००७ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तांतावर मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**आयत्या वेळेचे विषय :-**

**विषय क्र. २२ भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव या महाविद्यालयाचा जून २००८ पासूनच्या एम.सी.ए. भाग २ या अभ्यासक्रमाचा नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी :- भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव या महाविद्यालयाने जून २००७ पासून एम.सी.ए. भाग १ हा अभ्यासक्रम जून २००७ पासून सुरु केलेला होता व विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला होता. विद्यापीठ कायद्यामध्ये महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८३ (६) मध्ये विद्यापीठाच्या संलग्निकरणाशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नये अशी कायद्यात तरतूद आहे. सदरच्या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचा प्रस्ताव विद्यापीठाकडे प्रथम ८ ऑगस्ट २००७ रोजी सादर केलेला होता. तथापि त्यांचा प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८१ व ८२ नुसार नसल्याने व महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. बैठक २००६ /(५२७/०६)मशि-३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे सदरच्या अभ्यासक्रमाचे ठिकाण बृहत आराखड्यात नसल्याने सदरचा प्रस्ताव संस्थेस दि. ४ सप्टेंबर, २००७ रोजी परत पाठविलेला होता. तथापि सदर प्रस्ताव पुर्नविचारार्थ ठेवला असता सदरच्या अभ्यासक्रमास व्यवस्थापन परिषदेने दि.८/१०/२००७ ठराव क्र. १६ अन्वये एम.सी.ए. या अभ्यासक्रमास मान्यता दिलेली आहे. सदरच्या अभ्यासक्रमास अद्याप महाराष्ट्र शासनाची मान्यता नसल्याचे इकडील कार्यालयाचे कागदपत्रावरुन दिसते.

या महाविद्यालयाने एम.सी.ए. भाग २ या अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक वाढीचा

प्रस्ताव विद्यापीठाकडे दि.२/२/२००८ रोजी सादर केलेला आहे. सदरचा प्रस्ताव विद्यापीठ नियमानुसार ३१ ऑगस्ट २००७ पूर्वी सादर करणे गरजेचे होते. सदरचा प्रस्ताव त्यानुसार विद्यापीठास प्राप्त नाही. सदरच्या प्रस्तावाचे शुल्क अद्याप विद्यापीठान जमा करुन घेतलेले नाही.

नैसर्गिक वाढीच्या प्रस्ताव बी.सी.यु.डी. समितीच्या वतीने व्यवस्थापन परिषदेस विचारार्थ ठेवण्यास मा.कुलगुरुसाो यांनी शिफारस केलेली आहे. सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करण्यासाठी व सर्व बाबीवर योग्य निर्णय घेण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २२ भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव या महाविद्यालयास एम.सी.ए. भाग १ साठी शासनाकडून मान्यता प्राप्त झालेली नाही. त्यामुळे त्यांना सन २००८-०९ पासून एम.सी.ए. विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये असे कळवावे तसेच सदर महाविद्यालयाचा भाग २ साठी नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव स्वीकारता येणार नाही असे कळवावे असे ठरले.**

**विषय क्र. २३ दि.२५/०३/२००८ व दि.२७/०३/२००८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी सादर.**

टिपणी :- दि.२५/०३/२००८ व दि.२७/०३/२००८ रोजी केलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. २३ दि.२५/०३/२००८ व दि.२७/०३/२००८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. २४ चेंजिस इन स्टाफच्या समितीने तसेच व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेल्या श्री. जगताप एन. आर. यांच्या चेंजिस इन स्टाफच्या सुधारित मान्यतेबाबत.**

प्राचार्य, श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा यांनी पत्र पाठविलेले आहे. पत्र क्र. एस.एस.डी.एम./आर-६२६/२००६-२००७, दि.१४-०२-२००७ चे पत्र अवलोकनार्थ ठेवले आहे.

सदर पत्रामध्ये महाविद्यालयातील श्री. जगताप एन. आर. यांच्या चेंजिस इन स्टाफला मान्यता मिळावी म्हणून कळविले आहे.

१) श्री. जगताप एन. आर. यांना सन १९९४-९५ साली विहीत निवड समितीने निवड केलेली आहे. त्याप्रमाणे महाविद्यालयाने वर्कलोड पूर्णवेळ असल्याने त्यांना पूर्णवेळ म्हणून मान्यता दिली आहे. महाविद्यालयाने त्यावेळेस चेंजिस इन स्टाफला मान्यतेसाठी पाठविलेले आहे. शिवाजी विद्यापीठानेही त्यास मान्यता दिलेली आहे ती सोबत जोडली आहे.
२) श्री. जगताप यांचा कार्यभार महाविद्यालयाकडून मागवला असता त्यांना १९९५-९६ मध्ये दि.२८-०२-९६ पर्यंत पूर्णवेळ व नंतर २००५-०६ पर्यंत अर्धवेळ स्वरुपाचा कार्यभार होता असे दिसते. सन २००६-२००७ पासून कार्यभार वाढल्यामुळे श्री. जगताप एन. आर. यांना शिवाजी विद्यापीठ पत्र क्र. ॲफी/टी-५/व्ही/२४१, दि.३०-०६-१९९९ अन्वये पूर्णवेळ पदास मान्यता व त्यांना पूर्णवेळ नेमणुक दिलेली आहे.
३) महाराष्ट्र शासनाच्या ११-१२-१९९९ च्या जी.आर. नुसार पान नं. १२ कलम २१ प्रमाणे ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारसी मुळे सन (०१-०१-१९९६) पासून ज्या शिक्षकांचा कार्यभार कमी होईल त्यांना सर्व्हीस प्रोटेक्शन दिलेले आहे.

वरील १,२,३ पहाता चेंजिस इन स्टाफ समितीने शिफारस केलेली व व्यवस्थापन परिषदेने दिलेली चेंजिस इन स्टाफची मान्यता विसंगत आहे. पूर्वी

श्री. जगताप यांना चेंजिस इन स्टाफ मध्ये २००१ पासून पूर्णवेळ मान्यता दिली आहे. ती प्रत्यक्षात २००६-०७ पासून असणे गरजेचे आहे.

सदर महाविद्यालयानेही चेंजिस इन स्टाफच्या फॉर्ममध्ये दुरुस्ती करुन मिळावी अशा आशयाचे पत्र दिले आहे.

वरील सर्व गोष्टीचा विचार केला असता श्री. जगताप यांना सन २००६-०७ साठी मान्यता द्यावी बाबत व्यवस्थापन परिषदेस सादर.

**ठराव क्र. २४** **सदर विषयास खालील दुरुस्तीसह मान्यता देण्यात आली.**

**१) विषयातील परिच्छेद क्र. ७ "वरील --- गरजेचे आहे" वगळावा.**

**२) परिच्छेद क्र. ८ मध्ये "साठी" ऐवजी "पासून" असे वाचावे.**

**विषय क्र. २५** **प्रा. जे. टी. थिटे यांचे परीक्षेचे काम करीत असताना निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी :- सोलापूर विद्यापीठाच्या बी. ए. भाग २ व एम. ए. परीक्षेच्या मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र संचालक म्हणून प्रा. जे. टी. थिटे सोलापूर सोशल असोसिएशन्स आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर येथे दिनांक २५ ऑक्टोबर २००७ पासून काम करीत होते.

गुरुवार दिनांक २२ नोव्हेंबर, २००७ रोजी मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र संचालक म्हणून कार्य करीत असताना केंद्रावरच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबियांत कोणीही कमवती व्यक्ती नाही. त्यांना दोन अपत्य असून ते शिक्षण घेत आहेत.

सबब, कै. प्रा. जे. टी. थिटे यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. २५** **प्रा. जे. टी. थिटे यांचे मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राचे संचालक म्हणून काम करीत असताना दु:खद निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत म्हणून रु.५०,०००/- देण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. २६** **सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षासाठी विविध विद्याशाखांसाठी प्रथम सत्र समाप्ती व व्दितीय सत्र प्रारंभ व समाप्ती यांच्या तारखा निश्चित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी : - सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षासाठी विविध विद्याशाखांसाठी प्रथम सत्र प्रारंभाच्या तारखा सोबत जोडल्या आहेत. तसेच प्रथम सत्र समाप्ती व व्दितीय सत्र प्रारंभ व समाप्तीच्या तारखा निश्चित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २६** **सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षासाठी विविध विद्याशाखांसाठी प्रथम सत्र समाप्ती व व्दितीय सत्र प्रारंभ व समाप्ती यांच्या तारखा दुरुस्त्यांसह व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. २७** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७५ (३) (iii) नुसार खरेदी समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून २ सदस्यांच्या नामनिर्देशनाबाबत.**

टिपणी :-महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७५ (३) (iii) नुसार, खरेदी समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून २ सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २७** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७५ (३) (iii) नुसार, खरेदी समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून खालील २ सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**१) प्राचार्य जे. के. बिले - सदस्य.**
**२) प्रा. बी. पी. रोंगे - सदस्य.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे मा.प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**एम.एस.शेजूळ**
**सचिव, व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**बी. पी. बंडगर**
**अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद**